नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २७० | Issue - 270 | वार रविवार दि. १६ फेब्रुवारी २०२५ | Blow- Sunday Date 16 February 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...

### न्यू इंडिया बँकेचा महाव्यवस्थापक अटकेत, १२२ कोटींच्या अपहाराचा आरोप

मुंबई : न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेचा महाव्यवस्थापक व लेखा विभागाचा प्रमुख हितेश मेहता याला अटक करण्यात आली. बँकेच्या प्रभादेवी व गोरेगाव येथील कार्यालयातील १२२ कोटी रुपयांचा अपहार केल्याचा आरोप आहे. हे प्रकरण आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आले. प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी देवर्षी घोष यांनी केलेल्या तक्रारीवरून शनिवारी दादर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. हितेश मेहताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी व त्याच्या साथीदारांनी फौजदारी कट रचून त्याच्या ताब्यात देण्यात आलेल्या प्रभादेवी व गोरेगाव शाखेतील तिजोरीमधील १२२ कोटी रुपयांचा अपहार केल्याचा आरोप आहे. हा गैरप्रकार २०२० पासून १२ फ ेब्रुवारी २०२५ पर्यंत सुरू होता, असे तक्रारीत म्हटले आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (आरबीआय) न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेवर निर्बंध घातले आहेत. त्यामध्ये पुढील सहा महिन्यांसाठी नवीन कर्ज देण्यावर, नवीन ठेवी स्वीकारण्यावर किंवा पैसे काढण्याची परवानगी देण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. बँकेच्या मुंबई, ठाणे, सुरत आणि पुणे येथे बँकेच्या ३० शाखा आहेत.

# महाकुंभमेळ्यात पुन्हा भीषण अग्नितांडव

## सेक्टर १८ आणि १९ मध्ये भीषण आग, भाविकांमध्ये घबराटीचे वातावरण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रयागराज : उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये गेल्या काही दिवसांपासून महाकुंभमेळा सुरु आहे. या कुंभमेळ्याला देशभरातून लाखो भाविकांनी सहभाग घेतला आहे. महाकुंभमेळ्यात आतापर्यंत लाखो भाविकांनी पवित्र स्नान केलं आहे. मात्र, कुंभमेळ्यात आग लागल्याच्या आतापर्यंत तीन घटना घडल्या आहेत. आजही पुन्हा एकदा भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. महाकुंभमेळ्यातील सेक्टर १८ आणि १९ मध्ये भीषण आग लागल्याची घटना घडली. या घटनेत अनेक तंबू जळून खाक झाले आहेत.

महाकुंभमेळ्याच्या सेक्टर १८ आणि १९ मध्ये भीषण आग लागली. या आगीत अनेक तंबू जळून खाक झाल्याची माहिती समोर आली आहे. आगीची घटना घडल्यानंतर लगेच अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. दरम्यान, आतापर्यंत समोर आलेल्या माहितीनुसार आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. आगीचं कारण अद्याप समजू शकलेलं नाही. मात्र, ही आगीची घटना घडल्यामुळे भाविकांमध्ये मोठी घबराट निर्माण झाली असंही सांगण्यात येत आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

बचाव आणि मदत कार्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (छऊठऋ) आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल (डऊठऋ) च्या टीम देखील घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागल्याची प्राथमिक माहिती सांगितली जात आहे. तसेच सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, अनेक भाविकांचे साहित्य जळून खाक झाले असल्याचं सांगितलं जात आहे. गेल्या आठवड्यातही महाकुंभमेळ्याच्या सेक्टर १८ मध्येही अशीच आग लागली होती. शंकराचार्य मार्गावरील हरिहरानंद कॅम्पमधील २० हून अधिक तंबूंमध्ये आग पसरली होती. तेव्हाही अग्निशमन दलाच्या गाड्या तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या आणि काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आलं होतं.

महाकुंभमेळ्याच्या जत्रा परिसरात १९ जानेवारी रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास आग लागल्याची एक घटना घडली होती. शास्त्री पुलाजवळ सेक्टर १९ येथील गीता प्रेसच्या कॅम्पमध्ये आग लागली होती. आगीत गीता प्रेसच्या १८० कॉटेज जळून खाक झाल्या होत्या. दरम्यान, त्या आधी महाकुंभमेळ्यात मौनी अमावस्येच्या दरम्यान चेंगराचेंगरी घटना घडली होती. त्या घटनेत ३० जणांचा मृत्यू झाला होता तर ६० जण जखमी झाल्याचीही घटना घडली होती.

# दिल्ली रेल्वे स्थानकावर चेंगराचेंगरी १८ जणांचा मृत्यू, महाकुंभमेळ्याला जाण्यासाठी भाविकांनी गेली होती गर्दी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : उत्तर प्रदेशच्या प्रयागराजमध्ये गेल्या महिन्याभरापासून महाकुंभमेळा सुरू असून, दिल्लीतूनही मोठ्या संख्येने लोक महाकुंभात शाही स्नान करण्यासाठी जात आहेत. नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरून महाकुंभासाठी येथून दोन विशेष गाड्या चालवल्या जात आहेत. यामध्ये चढण्यासाठी मोठ्या संख्येने प्रवासी आले होते. यामुळे प्लॅटफॉर्म क्रमांक १४ आणि १५ वर काल रात्री चेंगराचेंगरी झाली. या घटनेत १८ जणांचा मृत्यू झाला तर १० पेक्षा जास्त प्रवासी जखमी झाले आहेत. जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. केंद्रीय मंत्री अश्विन वैष्णव यांनी या प्रकरणी ट्विट करत माहिती दिली आहे.

शनिवारी रात्री नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या चेंगराचेंगरीत १८ जणांचा मृत्यू झाला आहे तर १० पेक्षा अधिक जण जखमी झाले आहेत. ही चेंगराचेंगरी प्लॅटफॉर्म क्रमांक १४ आणि १५ वर झाली. ही घटना, रात्री ९:५५ वाजता घडली. खरंतर, कुंभमेळ्याला जाण्यासाठी नवी दिल्ली रेल्वे स्टेशनवर मोठी गर्दी झाली होती. दरम्यान, प्लॅटफॉर्म क्रमांक १४ आणि १५ वर प्रचंड गर्दी झाल्याने ही दुर्दैवी घटना घडली.

या घटनेबाबत बोलताना केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरील परिस्थिती आता नियंत्रणात आहे. दिल्ली पोलीस आणि आरपीएफ घटनास्थळी पोहोचले आहेत. जखमींना रुग्णालयात नेण्यात आले आहे. गर्दी नियंत्रित करण्यासाठी विशेष गाड्या चालवल्या जात आहेत. पुढे एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये अश्विनी वैष्णव म्हणाले, नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या दुर्दैवी चेंगराचेंगरीमुळे खूप दुःख झाले आहे. ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावले आहे, आम्ही त्यांच्याबरोबर आहोत.

दरम्यान, या घटनेनंतर दिल्लीच्या काळजीवाहू मुख्यमंत्री अतिशी यांनीही दुःख व्यक्त केले आहे. एक्सवर पोस्ट करत त्या म्हणाल्या, नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या चेंगराचेगरीत महाकुंभमेळ्याला जाणाऱ्या भाविकांचा दुर्दैवी मृत्यू अत्यंत दुःखद आणि हृदयद्रावक आहे. मी एलएनजेपी रुग्णालयात पोहोचली असून पीडितांच्या कुटुंबीयांना भेटली आहे. यामध्ये अनेक लोक जखमी झाले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. आमचे दोन आमदार पीडित कुटुंबांना मदत करण्यासाठी रुग्णालयात उपस्थित आहेत.

# सोलापूर शहरात विजेच्या धक्क्याने दुर्दैवी मृत्यू; एकजण गंभीर जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : शहरातील एम आयडीसी परिसरातील स्वागत नगर येथे नागेंद्र नगर पुठ्ठा किराणा दुकानाजवळ नवीन वीज जोडणी कनेक्शनचे खांबावर काम करणाऱ्या महावितरणच्या कर्मचाऱ्याला विजेचा जोरदार धक्का बसला. त्यांना जखमी अवस्थेत छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. यात शरणाप्पा मल्लिनाथ माळी (वय-४५,रा.तेरामैल, मंद्रूप) असे मृत कर्मचाऱ्याचे नाव आहे. ही घटना शनिवार १५ फेब्रुवारी रोजी घडली.

यात मिळालेली माहिती अशी की, शनिवारी दुपारच्या सुमारास महावितरणचे कर्मचारी शरणाप्पा माळी व प्रवीण घोडके हे स्वागत नगर येथे काम करत होते. महावितरणच्या खांबावरील वीज नवीन वीज जोडणी जोडत होते. खांबावर चढण्यापूर्वी तेथील वीज पुरवठा बंद केला होता. मात्र वायर जोडताना त्याला धक्का लागून तो चिटकून राहिल्याने बेशुद्ध पडला. त्याला खाली उतरवून तात्काळ उपचारासाठी सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल केले.

वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेत महावितरणचा दुसरा कर्मचारी प्रवीण घोडके (रा. सोलापूर) याच्यावर शहरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या परिसरात घटनेची माहिती मिळताच महावितरणचे अधिकारी, कर्मचाऱ्यांनी दाखल झाले. त्यांनी घटनेची माहिती घेतली. वीज पुरवठा बंद माळी आणि घोडके हे दोघे कर्मचारी काम होते तर विजेचा धक्का लागला कसा? याची चौकशी आता महावितरणचे वरिष्ठ अधिकारी करीत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. यावेळी या परिसरात घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सहकुटुंब कुंभस्नान; वाराणसीत काशी विश्वेश्वराचे दर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रयागराज : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज प्रयागराज येथे पत्नी अमृता आणि मुलगी दीविजा यांच्यासह कुंभस्नान केले. कुंभस्नानानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला. मुख्यमंत्री म्हणाले की, सहकुटुंब महाकुंभात येण्याचे भाग्य लाभले, याचा मला अतिशय आनंद आहे. यावर्षी १४४ वर्षांनी विशिष्ट योग आला आहे. त्या पर्वावर मला संगमावर स्नान करण्याचे भाग्य लाभले. कुंभमेळ्यासाठी उत्तरप्रदेश सरकारने अतिशय सुंदर व्यवस्था केली आहे. एक नवा विक्रम आणि नवा इतिहास येथे घडला आहे. ५० कोटी भाविकांनी आतापर्यंत येथे उपस्थिती लावली आहे. भारताची आस्था पाहून संपूर्ण जग आज आश्चर्यचकित आहे. हीच आपली दिव्यता, हीच आपली भव्यता, हाच आपला कुंभ आहे. हेच आमचे संस्कार आहेत, हीच आमची संस्कृती आहे. २०२७ च्या नाशिक महाकुंभाची तयारी आम्ही सुरु केली आहे. दरम्यान, प्रयागराज येथून मुख्यमंत्री फडणवीस थेट वाराणसीत गेले आणि तेथे त्यांनी सहकुटुंब काशी विश्वेश्वराचे दर्शन घेतले.



**महायुतीचा विजय हा बाळासाहेबांच्या चरणी अर्पण** — **उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रतिपादन**

# शिवसेना फुटीबाबत उद्धव ठाकरेंनी आत्मचिंतन करण्याची गरज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रत्नागिरी : शिवसेना ठाकरे गटातून लोक बाहेर पडत आहे, त्याचे उद्धव ठाकरेंनी आत्मचिंतन करण्याची गरज आहे. शिवसेना ठाकरे गटात कार्यकर्त्यांचे खच्चीकरण करण्याचे काम केले गेले. मात्र बाळासाहेबांच्या या शिवसेनेत काम करणारा कार्यकर्ता राजा असणार आहे. आम्हाला शिव्या शाप देणाऱ्यांना कामातून उत्तर द्यायचे आहे, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. रत्नागिरी येथे घेण्यात आलेल्या महायुतीच्या आभार सभे प्रसंगी ते बोलत होते.

कोकणचा विकास करण्यासाठी कोकण विकास प्राधिकरणाची निर्मिती करण्यात आली आहे. कोयनेतून वाहून जाणारे ६७ टीएमसी पाणी थांबवण्याचे काम सरकारकडून करण्यात येत असल्याचे शिंदे यांनी यावेळी सांगितले. ते म्हणाले, महायुतीचा विजय हा बाळासाहेबांच्या चरणी अर्पण आहे. कोकणाने बाळासाहेबांवर आणि धनुष्यबाणावर प्रेम केले आहे. शिवसेना वाढीमध्ये कोकणाचा सिंहाचा वाटा आहे. नुकत्याच झालेल्या निवडणूकमध्ये महाविकास आघाडीपेक्षा आपला स्ट्राइक रेट जास्त आहे. शिवसेनेचा एकही आमदार निवडून येणार नाही, असे भाकीत करणाऱ्यांची तोंडे बंद झाली आहेत. ८० पैकी ६० जागा शिवसेनेने निवडून आणले आहेत. महायुतीचे २३२ आमदार निवडून आले आहेत. महायुतीला पंधरा लाख मते जास्तीची मिळाली आहे. लाडक्या बहिणींनी महायुतीला मत दिल्याने शिवसेनेने अभूतपूर्व यश मिळवले असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

ते म्हणाले, महाविकास आघाडीने बंद पडले सर्व उद्योग प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. महाराष्ट्र विकासाला चालना देण्यात आली आहे. मी मुख्यमंत्री असताना महाराष्ट्र एक नंबर ला आणून ठेवला आहे. पदे येतात आणि जातात, सत्ता येथे जाते मात्र एकदा नाव गेले की परत येत नाही असे शिंदे यांनी सांगितले. दावोसला जाऊन जाऊन १६ लाख कोटीचा उद्योग करार करण्यात आला आहे. यामुळे रोजगार उत्पन्न होणार आहे. कोण रामदास कदम ?कोण एकनाथ शिंदे ? असे म्हणणाऱ्यांना आम्ही कोण आ- होत हे दाखवून दिले आहे. आमच्या नादी लागू नका असा इशाराही शिंदे यांनी दिला. जोपर्यंत आमच्या मागे लाडक्या बहिणी, भाऊ आणि लाडके शेतकरी आहेत, तोपर्यंत आम्हाला कोणाचीही भीती नसल्याचे यांनी सांगितले. यावेळी दापोलीचे आमदार योगेश कदम यांनी कोकणात आणखी शिवसेना वाढवणार असे आश्वासन शिंदे यांना दिले. माजी पर्यावरण मंत्री रामदास कदम यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, बाळासाहेबांच्या विचाराला कालिमा फासण्याचे काम उद्धव ठाकरे यांनी केले आहे. मुख्यमंत्री पद घेऊन बाळासाहेबांनी कमावलेल सगळं गमावलं आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे झाले नसते तर शिवसेना फूटली नसती असे रामदास कदम यांनी सांगितले. ते म्हणाले, शिवसेना वाढवण्यामध्ये उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे त्यांचे कोणतेच कर्तुत्व नाही. यांना हे सर्व आयते मिळाले असल्याचे टीका कदम यांनी यावेळी केली. यावेळी व्यासपिठावर आमदार योगेश कदम, आमदार किरण सामंत, आमदार निलेश राणे , उद्योगमंत्री उदय सामंत, माजी आमदार राजन साळवी, माजी आमदार रामदास कदम, माजी आमदार सुभाष बने, रवींद्र फाटक, राजु महाडिक, बंड्या साळवी, माजी आमदार सदानंद चव्हाण यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते..




उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत राजेंद्र महाडिक यांनी आपल्या पत्नीसह शिंदे गटात प्रवेश केला. तसेच माजी जीप अध्यक्ष रोहन बने, पराग बने, ठाकरे गटाचे माजी जिल्हाध्यक्ष विलास चाळके, बाळा जाधव, अशोक सावंत यांच्यासह आठ विद्यमान सरपंच, उसरपंच, सदस्य यांनी शिवसेनेत पक्ष प्रवेश केला. शिवसेना ठाकरे गटातून हाकालपट्टी करण्यात आलेले जिल्हाप्रमुख विलास चाळके, रोहन बने, राजेंद्र महाडिक यांनी शिवसेना शिंदे गटात जाहीर पक्ष प्रवेश केला. शिवसेनेच्या या आभार सभेसाठी महिला व विद्यार्थ्यांना वेठीस धरण्यात आले. रत्नागिरीतील ३०० पेक्षा जास्त एसटी फे-या रद्द करुन लाडक्या बहिणींना आणण्यासाठी गावो गावी पाठविण्यात आल्याने प्रवाशांची व विद्यार्थीवर्गाची चांगली धावपळ झाली.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



# तीची पाठमोरी कृती आणि माझी घालमेल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवतरुणांनासाठि मदोहशीने भरलेली, तारुण्याच्या उंबरठ्यावर मंत्रमुग्ध करणारे पौगांड अवस्थेतील नववी दहावीचे ते दिवसं..

त्यात माझ्याही काही आठवणी उजाळल्या. त्याला तसे कारण ही आहे त्या आठवणीच्या संबंधित असलेल्या एका क्ष व्यक्तीची योगायोगाने भेट व यासोबतच उद्या होउ घातलेला

जागतिक व प्रेम दिन ... Happy valentine day

खरोखरंच हवे हवे असणारे ते दिवस ना कोणती चिंता,

ना कसली जबाबदारी,मनाला वाटेल ते करण्याची धमक,

नवं सळसळत रक्त, विनाअनुभवी परंतु मोठी हिम्मत अशी एकंदरीत सर्वच तरुण व तरुणींची मनस्थिति असते त्यात माझीही थोडीफार भर..

तो अनुभव आजही अनुभवू शकतो इतका ताजा. त्या आठवणी म्हणजे ऐन उन्हाळ्यात खोडाला जशी पालवी फुटावी तेही टवटवीत बरं का..! हव्याहव्याशा आठवणी

त्यावेळी प्रेम वगैरे काही समजायचे नाही.परंतु एक कमी अधिक स्ट्राँग अशी भावना, एक ओढ असायची त्यात मी थोडा लेटच होतो म्हणा,परंतु तिची फिलिंग ही माझ्या बाबत फार स्ट्राँग होती. मी उदास व एकटाच जेव्हा केव्हा असायचो तेव्हा ती सतत मला बोलण्याचा माझ्याकडून वदवुन घेण्याचा प्रयत्न करायची परंतु मी जास्त व्यक्त होत नव्हतो.जेव्हा कधी मी डबा आणायचो नाही अथवा जेवायचो नाही त्यावेळेस ती आवर्जून माझा हात धरून घेऊन जाऊन स्वतःच्या डब्यातील जेवण मला तीच्या हाताने चारण्याचा प्रयत्न करायची परंतु मी तिला नकार देत असे. तरीसुद्धा माझी इच्छा नसतानाही ती घास भरवत असे.मी तीज्याशी अभ्यासाव्यतिरिक्त बोलण्याचा प्रयत्न करत नव्हतो.तरी देखील ती जेव्हा जेव्हा मी एकटं, उदास राहायचो ती नेहमी मला पाणी शिंपडून, जोक करून,पाठीमागे येऊन माझे डोळे झाकून मला बोलतं करण्याचा माझा मूड फ्रेश करण्याचा प्रयत्न करत.. त्याचबरोबर तिच्या शेतातून नेहमी मला आंबे बोरं इत्यादी फळ आणून मोठ्या आवडीने द्यायची. मी मात्र तिला नेहमी माझी एक प्रतिस्पर्धी समजत असे..

आमच्या शाळेची हैदराबाद येथे सहलीचे नियोजन झाले असता त्यात तिचा सहभाग नव्हता. मी त्यावेळेस तीची जास्त काही विचारपूस न करता मी माझा सहलीला जाऊन आलो. यानंतर जे कोणी विद्यार्थी त्या सहलीला जाऊ शकले नाही त्यांच्यासाठी एक आठवड्या भरानंतर दुसरी छोटीशी दोन दिवसीय जवळची सहल आयोजित करण्यात आली होती. त्यावेळेस ती उत्साही व आग्रही होती. परंतु जे विद्यार्थी अगोदर हैदराबाद सहलीला जाऊन आले आहेत त्यांना यामध्ये परवानगी नव्हती. तसा नियम असतानाही ती माझ्यासाठी शिक्षकांना खूप भांडून माझं नाव त्या लिस्टमध्ये टाकली व मला कसेबसे तयारही केली. त्यामध्ये आणखीन एक आठवण अशी की तिला माझेच कपडे म्हणजे जीन्स व टी शर्ट घालायचे होते.त्यावेळेसची नवीन फॅशन तिला कदाचित खूप आवडायची परंतु सामाजिक बंधनामुळे ती घालू शकत नव्हती.या कारणाने ती मला आवर्जून ते कपडे आणायला सांगितले होते. परंतु मी ते स्वतः घालून त्या ट्रिप साठी गेलो होतो. मला काय माहित ते तिला नेसायचे होते म्हणून. मला रागाराग न करता तसेच मला तिचा बेत न कळवता दुसऱ्या दिवशी माझे ते घातलेले कपडे पून्हा ती परीधान केली..

कॅमेरा आणायला व वापरयला बंदी असताना तिने तो वापरला तिच्यामध्ये बंड करण्याची वृत्ती बळावली होती. तिचा आत्मविश्वास दुणावला होता.ती एका नव्या विश्वात स्वातंत्र्यपूर्ण श्वास घेत झेपावली होती जसे की शेवटची तिची ती यात्रा सहल होती. एकूण मनसोक्त आनंद लुटणारी अशी तिची ती संपूर्ण देहबोली दिसत होती.का कुणास ठाऊक या अगोदर तिला मी इतकी आनंदी व उत्साही पाहिली नव्हती (कदाचित तिचे लग्न ठरणार होते म्हणून हसून खेळून जगून घ्यावं असं तिला वाटत असेल.)

त्यानंतर काही दिवसाने तिचे लग्न ठरले त्यात आणखीन भर दहावीचा बोर्डाच्या परीक्षेचा तणाव..

आम्ही नेहमी एकमेकांचे प्रतिस्पर्धी होतो.ते असे कि, तीमाहि परीक्षेत मी एक नंबर काढला तर सहामाहीत ती एक नंबर काढायची. पुन्हा मी जास्त प्रयत्न करून नवमाहीत मी बाजी मारायचो आणि पुन्हा वार्षिक मध्ये ती.. असे आमचे एकंदरीत कॉम्पिटिशन चालायचे तरी देखील ती माझ्यापेक्षा हुशार व उत्साही होती.

सेंडअप जवळजवळ येत होता सारी मुले अस्वस्थ होत होती. त्यात आम्हीही सेंडअप च्या दिवशी सर्व एक दिवसासाठी शिक्षक बनलो होतो शाळेला ग्रँड नसल्याने शाळा व आम्ही विद्यार्थी दोघेही अविरत कष्ट घेत होतो संस्था व आमच्या भविष्यासाठी.

त्या दिवशीचा आणखी एक क्षण असा की, माझ्यासमोर नीसंकोचपणे ती साडीच्या निरृया व्यवस्थित करत माझ्याशी संवाद साधत होती.माझी मात्र पाचावर धारण बसली होती कि,कोणीतरी येऊन रागावतील या कारणाने इतर मुली मात्र कमालीची सावधानता बाळगत कोणत्याही मुलांना तिकडे फिरकू देत नव्हत्या.सांगण्याचा मुद्दा हा आहे की माझ्यावरील तीचा विश्वास व कम्फर्टनेस इतकचं..ती आमची शेवटची भेट. त्या भेटी नंतर मी तीची फक्त पाठमोरीकृतीच पाहीली ती अशी.. तिचे लग्न वगैरे झाले मीही कधी भेटण्याचा प्रयत्न केला नाही परंतु खुशहालीची खबर मिळवत होतो.कॉलेजमध्ये एकदा ॲडमिशनचे फॉर्म भरत असताना तिच्या पतीसोबत तीची पाठमोरीकुती पाहिली व तिला न भेटता तसाच पावसामध्ये भिजत निघून गेलो(तो पाऊस अजिबात जाणवतच नव्हता).. त्यानंतर बरीच वर्ष गेली आमचा कसलाही संपर्क आला नव्हता.. एके दिवशी माझ्या एका ब्राह्मण पंडित मित्राने मला म्हणाला आपल्याला एका गावी पूजेसाठी जायचं आहे असे सांगून त्याच्यासोबत जाण्यासाठी मला बळचं तयार केला व मीही त्याच्यासोबत जास्त काही विचारपूस न करता गेलो. त्यावेळेस तो बोलता बोलता तिच्याच गावाचं नाव उच्चारला. शांत झालेल्या पाण्यामध्ये पुन्हा तरंग उठावा अशी माझ्या मनाची अवस्था झाली.मी माझ्या मनाला म्हणालो गावच आहे ना बघूया.. आल इज वेल शांत राहा.मी त्या गावात पोहोचलो व पुन्हा मला कळालं त्याच आडनावाच्या घरी जायाचे होते.पुन्हा मनाची धडधड वाढत चालली होती समोरून पाहतो तर काय तिचा भाऊच आम्हाला घेण्यासाठी आला.. पुन्हा मी माझ्या मनाला म्हणालो ही पुजा तिच्या भावकी मध्ये कोणाच्या तरी घरी असेल असे मी माझ्या मनाला सावरत घरी पोहोचलो आणि कळून चुकले की तिच्याच घरी पूजा आहे म्हणून. आता आणखी काय वेड्यात काढू या मनाला..ते तरंग आता चक्रीवादळात रूपांतरित झाले होते. काय तो योगायोग तालुक्यात १५० गावांपैकी तेच गाव,त्या गावातील ५० त्याच आडनावाच्या कुटुंबापैकी तीचच ते कुटुंब,तरीही मनाला धीर देत पूजा कार्यक्रम हा माहेरच्या घरी आहे भेट होईलच असे नाही ना.. मग काय आम्ही घरी गेलो आणि माझा तो मित्र त्याच्या विधी कार्यात मग्न होऊन त्याचा तो बिझी झाला.मी व माझ्या आठवणी बसलो एकमेकांशी संवाद साधत. पुन्हा पुन्हा त्याच आठवणीचा उजाळा. उजाळा काय संपूर्ण उजळणीच होत होती ती..

तो कार्यक्रम मध्यात आला होता. माझे डोळे मात्र तिला पाहण्यासाठी आसुसलेले होते.मन सैरावैरा फिरत त्या संपूर्ण घराला घीरट्या घालत होते.परंतु हिंमत होत नव्हती की कोणाला तरी विचारावं प्रत्यक्ष जाऊन भेट घ्यावी. सामाजिक बंधने, जात-पात, उच्च नीच, गाव खेड्यात मुला मुलींमध्ये एवढ फ्री वातावरण नसते त्याचबरोबर माझा स्वभाव असा की, आपल्याकडून इतरांना कसलीच तक्रार व त्रास होऊ नये याची दक्षता मी नेहमी घेतच असतो कदाचित याच कारणामुळे मी संपूर्ण आयुष्य व्यक्त झालो नाही असो.. जवळपास सर्व विधी पूजा समाप्त झाली त्यानंतर जेवणासाठी मला बोलावण्यात आले.माझी इच्छा नव्हती तरीही मोठ्या शीताफीने स्वतःला आवर घालत खाली मुंडी घालून कसेबसे दोन घास खाल्ले व बाहेर येऊन थांबलो. निराश होत आणि परतिचा प्रवास करणार तेवढ्यात वादळ पुन्हा धडकलं होतं तेव्हा पुन्हा तीची तीच पाठमोरीकृती पाहिली जी कॉलेजमध्ये फॉर्म भरताना पाहिली होती. नकळतपणे एक वीज कडाडून संपूर्ण शरीरातील प्राण काढून गेल्यासारखे फील झाले.हृदयामध्ये स्पंदनाने हाहाकार माजवला होता काही समजेनासे झाले होते.आम्हा दोघांची नजरानजर होईल का?ती काय रिॲक्ट करेल? मी काय बोलावं, तिच्या सामोरे कसे जावं ह्या विवंचनेत होतो.



तीची पाठमोरीकृती बघत बघतच मी पुढे माझ्या मित्रा सोबत चालत होतो तिचा आवाज त्या संपूर्ण गोगांटातून सुस्पष्ट ऐकू येत होता.शेवटपर्यंत तिचा चेहरा पाहायला न भेटताच नुसती तीची पाठमोरीकृती आणि माझ्या मनाची घालमेल..

काही वेळाने माझ्या मित्राला विचारपूस करण्याचा प्रयत्न केला तेव्हा कळाले त्यांच्यामध्ये थोडा वाद झाला होता त्या कारणाने ती उशिरा आली होती.सक्रिय सहभाग न घेता एका जागी उभी थांबूनच ती तिच्या घराकडे पाहत होती आणि पाठीमागून मी तिच्या पाठमोरीकृती ला..

पुन्हा काही दिवसांनी ते वादळ ते तरंग कसेबसे शांत झाले.आम्ही कसल्याच प्रकारच्या संपर्कात नव्हतो.मोबाईल फोन्स,मेसेज वगैरे काही नाही.तथापी त्या नात्याचा ओलावा कायम होता याची प्रचिती पुन्हा आली. घडले असे की मी एका माझ्या वर्गमित्राला भेटायला गेलो असता आमचा एक जुनियर वर्गमित्र योगायोगाने तिथे आम्हाला भेटला.व तो तिच्या संदर्भात सांगू लागला मी विचारपूस न करताच तो मोठ्या उत्साहाने तिच्याबद्दल बोलत होता. त्याने बोलता बोलता हे कबूल केले की, माझ्याकरीता आंबे,बोरं इत्यादी तिच्या शेती मधील फळभाज्या ती त्याच्याकडे पाठवत असे. तो मला दिलं आहे असे खोटं बोलून तिच्याकडून चार सहा वेळा स्वतः घेतला होता.हे ऐकताच मी कृतज्ञ झालो आणि त्यावेळेसच्या अश्याच आणखीन एका आठवणीत गुंगून पडलो. ते असे कि,आंब्याचा सीझन चालू होता तिच्या चेहऱ्यावर एक जखमेसारखा काळा डाग पडला होता.मी तिला त्याबद्दल खूप वेळा विचारले ती सांगत नव्हती पुन्हा तिच्या एका मैत्रिणीकडून कळाले की आंबे तोडत असताना अर्धवट पिकलेल्या आंब्याचा चीक चेहऱ्यावर पडून चेहरा जखमी झाला होता व ही सर्व खटाटोप ती माझ्यासाठी करत होती. हे ऐकून मी त्यावेळेस पुन्हा भारावून गेलो होतो... असो इतका लेख लिहिण्याचा खटाटोप उठाठेव यासाठीच की, प्रेम हे मिळवण्याची शर्यत नसून ती एक भावना आहे.

त्या भावनेला आपण दूर राहूनही जाणून घेऊ शकतो.. खरंच किती तो कमालीचा समजूतदारपणा,किती तो साधेपणा, किती ती सामाजिक बंधने, किती तो जातीपातीच्या घट्ट वेढा...

असो..तूर्तास थांबूया धन्यवाद

**– ज्योतिबा पारखे**

## आ. अभिजीत पाटील यांच्या संकल्पनेतून शिवजयंती निमित्त तीन दिवस व्याख्यान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक शिवतीर्थ येथे प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री विठ्ठल प्रतिष्ठान पंढरपूर यांच्या वतीने अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानमाला दिनांक १५ ते १७ फेब्रुवारी २०२५ अखेर संपन्न होणार आहे.

दिनांक १५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ठीक सहा वाजता श्री गणेश शिंदे यांचे व्याख्यान होणार आहे. दिनांक १६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ठीक सहा वाजता राहुलजी गिरी यांचे व्याख्यान होणार आहे असून. दिनांक १७ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी सहा वाजता शाहीर डॉक्टर देवानंद माळी यांच्या पोवाड्याचा कार्यक्रम शिवतेचा संपन्न होणार आहे.

## तोळणूर गावचे दिव्यांग झी कन्नड सारेगमप गायक रेवणसिद्ध फुलारी रुपेरी पडद्यावर झळकणार



**जनरींदा नानू मेले बंदे नूतन चित्रपटात तोळणूर (ता.अक्कलकोट) गावचे दिव्यांग बाल गायक रेवणसिद्ध फुलारी यांनी पार्श्वगायन (प्लेबॅक सींगिग) करून रुपेरी पडद्यावर प्रवेश केल्याने सत्कार करण्यात आले. यावेळी दिग्दर्शक नवीलुगरी नवीन, निर्मापक हेमावती, संगीत दिग्दर्शक प्रणव सतीश, अभिनेता गंधर्व राज, शिवण्णा, विशाला सतीश आदी दिसत आहे.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : तालुक्यातील कर्नाटक-महाराष्ट्र सीमेवरील तोळणूर गावचे सुपुत्र दिव्यांग बाल गायक झी कन्नड सारेगमप सींगींग रियालिटी शोमध्ये अप्रतिम गायनाने सर्वांचे मन जिंकलेल्या रेवणसिद्ध फुलारी यांनी स्वतःचा अस्तित्व सिद्ध करत नवीन कन्नड चित्रपट जनरींदा नानू मेले बंदे चित्रपटात पार्श्वगायन प्लेबॅक सींगिग) द्वारे दोन अप्रतिम गाणे गायन करून आता कर्नाटक चित्रपट सृष्टीत रुपेरी पडद्यावर झळकणार असून सर्वत्र कौतुक होत आहे.

कर्नाटक राज्यातील नंबर वन सिंगिग रियालिटी शो झी कन्नड सारेगमप फायनालिस्ट तोळणूर (ता.अक्कलकोट)चे सुपुत्र रेवणसिद्ध फुलारी नुकतेच आर. टी.नगर बेंगळुरू येथे नवीन कन्नड चित्रपट जनरींदा नानू मेले बंदे या नवीन चित्रपटातील दोन गाणे गायन करून पार्श्वगायक म्हणून रुपेरी पडद्यावर प्रवेश केला आहे.

चित्रपट नवीलुगरी नवीन दिग्दर्शन केले असून निर्मापक म्हणून हेमावती काम पाहत असून संगीत दिग्दर्शक प्रणव सतीश यांनी संगीत संयोजन केले आहे. चित्रपट निर्मितीसाठी विशाला सतीश, गंधर्व राज आणि शिवन्ना परिश्रम घेत आहे.

मागील दोन वर्षापूर्वी महाराष्ट्र राज्यातील पहिला दीव्यांग बाल गायक कोणताही संगीत पार्श्वभूमी नसताना स्वतः प्रयत्न करून झी कन्नड सारेगमप मध्ये टॉप फोर मध्ये स्थान पटकावून नंतरचा काळात देहली, मुबई, पुणे, चैन्नई, केरळ, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, गोवा आदी राज्यात आणि कर्नाटकातील सर्व जिल्ह्यात संगीत शोमध्ये संगीत कार्यक्रम दिले आहे. कर्नाटक राज्यातील तसेच देशातील दिग्गज संगीत कलाकारांकडून गायन, तबलावादन, हार्मोनियम, कॅशिओ, पॅड वादन मध्ये वाहवा मिळविला आहे.आता डायरेक्ट प्लेबॅक सिंगिगसाठी रुपेरी पडद्यावर संधी मिळाल्याने सीमावर्ती भागातील कन्नड - मराठी भाषिक संगीत प्रेमी आणि सोलापूर जिल्हा तसेच कर्नाटक राज्याला लागून असलेल्या केरळ, गोवा, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तामिळनाडू राज्यातील सीमावर्ती कन्नड भाषिक, विविध क्षेत्रातील मान्यवर अभिनंदन करून पुढील संगीत क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करण्यासाठी शुभेच्छा देत आहे.

## विद्यार्थ्यांनी स्वत: मनन, चिंतन, स्मरण करूनच परीक्षेचे लेखन करावे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया : विद्यार्थी हा शालेय जीवनात आपले व्यक्तिमत्त्व तयार करणारा बहुआयामी समाजाचा शिक्षित घटक आहे. विद्यार्थ्यांच्या जीवनात इयत्ता दहावीची बोर्ड परीक्षा म्हणजे जीवनातील टर्निंग पाइंट आहे. दहावीच्या गुणांची टक्केवारी वरून विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणाची दारे उघडतात. आजच्या जगात आपणच आपले शिल्पकार असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी, मनन, चिंतन व स्मरण करून परीक्षेचे लेखन करावे. नक्कीच यश संपादन कराल असे मार्गदर्शन आणि योग्य टिप्स अध्यापक मुन्नाभाई नंदागवळी यांनी दिल्या.

इयत्ता दहावीच्या परीक्षेला २१ फेब्रुवारीपासून सुरूवात होत आहे. याच अनुषंगाने विद्यार्थ्यांना परीक्षेला सामोरे जाताना कुठल्या गोष्टींची काळजी घ्यावी, यावर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन गुरुवारी मुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपुरा मुर्री येथे मुख्याध्यापक रविशंकर इठुले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

**मुन्नाभाई नंदागवळी : परीक्षेसाठी दिल्या योग्य टिप्स, काळजीपूर्वक परीक्षेला सामारे जावे**

अशावेळी परीक्षा देणारे विद्यार्थी हे गोंधळून जाता कामा नये, मनात कोणताच भीतीदायक मानसिक ताण नसावा. परीक्षा समोर असताना विद्यार्थी हा तणावमुक्त असावा, डोक्यामध्ये तणावरहीत प्रश्न असू नयेत. मोकळ्या मनाने विचारपूर्वक परीक्षा द्यायला हवी. आपल्या पेपर लेखनावर विश्वास ठेवावा. उत्तम, सुस्पष्ट, नीटनेटके, रचनानुसार लेखन करावे. यासाठी या उपक्रमांतर्गत मार्गदर्शन करण्यात आले. परीक्षा दरम्यान प्रश्न निटपणे समजून घ्यावे आणि नंतरच उत्तरे उत्तरतालिकेत लिहावी. प्रश्नाचे स्वरूप लक्षात घेऊन त्याचे उत्तर हे सुंदर हस्ताक्षरात, मुद्देसूद, उत्तराची भाषा ही प्रमाणशीरच असावी यावर मार्गदर्शन केले. परीक्षेला सामोरे जाताना या मार्गदर्शन कार्यक्रमाचे संचालन अमोल शहारे याने केले तर आभार हर्षल सांगोळकर याने मानले.

**दोन महिन्यांपूर्वी अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधित ॲट्रॉसिटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल; अद्याप ही आरोपी मोकाट**

**सहाव्या दिवशी ही अमरण उपोषणावरती उज्वला गायकवाड ठाम**

# बारामतीचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड आणि पोलीस निरीक्षक विलास नाळे यांनी कर्तव्यात कसूर केली असल्याचा आरोप करत त्यांच्या विरोधातही केली कारवाईची मागणी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : बारामती : व्यवसायासाठी घेतलेले कर्ज फेडूनही जातीय दुजाभावाचा सामना करावा लागलेल्या उज्वला गायकवाड या महिलेने बँकेच्या अधिकाऱ्यांविरोधात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्यानुसार कारवाईची मागणी करत बारामती प्रशासकीय भवनासमोर सहा दिवसांपासून बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे.

गायकवाड यांनी बारामतीतील बँक ऑफ बडोदा शाखेतून २०१५ मध्ये व्यवसायासाठी पाच लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. कर्जाची पूर्णपणे फेड करूनही, हारवेस्टरसाठी नव्या कर्जाची मागणी केल्यावर बँक अधिकाऱ्यांनी जातीय टिप्पणी करत कर्ज नाकारल्याचा आरोप आहे.

**बारामती शहर पोलीस ठाण्यात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्यांतर्गत दोन महिन्यांपूर्वी तक्रार दाखल झाली असली, तरी अद्याप कोणतीही अटक झालेली नाही. बारामतीचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड आणि पोलीस निरीक्षक विलास नाळे यांनी कर्तव्यात कसूर केली असल्याचा आरोप करत त्यांच्या विरोधातही कारवाईची मागणी केली आहे. या मागणीसाठी उज्वला गायकवाड यांनी बेमुदत आमरण उपोषण सुरू केले असून, त्यांना विविध सामाजिक संघटनांकडून पाठिंबा मिळत आहे.**

गायकवाड यांच्या तक्रारीनुसार, बँकेचे तत्कालीन मॅनेजर ललीत निनाजी नाळे, किरण जाधव आणि विवेकसिंग चांदुलय यांनी त्यांना हीन वागणूक दिली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...




### फोनवर बोलताना मोबाईल पळवला

सोलापूर : बुधवार बाजार येथील शांती चौक कडे जाणाऱ्या सार्वजनिक रोडवर मॉर्निंग चालत जाताना पाठीमागून रिक्षातून आलेल्या अज्ञात इसमाने फोनवर बोलत असलेला मोबाईल चोरून नेल्याची घटना १४ फेब्रुवारी रोजी घडली. याप्रकरणी श्रीनिवास लक्ष्मीनारायण येमुल (वय-५६, रा. साखरपेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# तालुक्यातील बोरी उमरगे येथे अनादी काळापासून चालत आलेली श्री लक्ष्मी थंडी यात्रा

## १८ फेब्रुवारी रोजी होणार भाकणुक कार्यक्रम; महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : तालुक्यातील बोरी उमरगे येथे अनादी काळापासून चालत आलेली श्री लक्ष्मी थंडी यात्रा भाकणुक कार्यक्रम मंगळवार दि.१८ फेब्रुवारी २०२५ रोजी होणार आहे.

अनादी काळापासून चालत आलेली श्री लक्ष्मी माता थंडी यात्रा भाकणुक आज पर्यंत तंतोतंत खरे ठरले असल्याने महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील कलबुर्गी, विजापूर, धाराशिव, सोलापूर आदी जिल्ह्यातून शेतकरी,भाविक भक्त येथे मोठ्या संख्येने गर्दी करतात. मंगळवार दि. १८ रोजी रात्री ९ वाजता बोरी उमरगे येथील श्रीक्षेत्र लक्ष्मी मंदिर, दोड्डे लक्ष्मी मंदिर व डोंगर लक्ष्मी मंदिराचे कलशारोहण कार्यक्रम करण्यात येणार असून रात्री अकरा वाजता गावातून श्री लक्ष्मी माता पालखीचे भव्य मिरवणूक सोहळा होणार आहे.यानांतर रात्री बारा नंतर उमरगे येथून श्री लक्ष्मी माता पालखीचे मिरवणूक सोहळा डोंगर लक्ष्मी मंदिर कडे प्रयाण होणार आहे.डोंगर लक्ष्मी मंदिर येथे रात्री एक दीडच्या सुमारास भाकणुकीस सूरवात होणार असून शेती पीक पाणी पाऊस रोग राई व राजकीय घडामोडी बद्दल भाकणुक सांगितले जाते.या भाकणुकी नुसार महारष्ट्र कर्नाटक सीमा भागातील शेतकरी वर्षभरातील आपल्या शेतीचे पीक पाणी मशागत बद्दल नियोजन करतात. या यात्राचा उमरगे, मैंदर्गी, मिरजगी, रामपूर, हत्तीकणबस कंठेहल्ली, संगोळगी (आ) चिक्केहल्ली या पंचक्रोशीतील भाविक भक्तच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आले आहे.मंगळवार दि.१८ रोजी डोंगर लक्ष्मी मंदिर येथे रात्रभर महाप्रसादची व्यवस्था करण्यात आले असून भाविक भक्तांनी उपस्थित राहून दर्शन व महाप्रसादची आवाश्य लाभ घ्यावा असे आवाहन पंच कमिटी वतीने करण्यात आला आहे.

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरास दोन लक्ष रुपयाची देणगी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीस नित्या मुक्तानंद चॅरिटेबल ट्रस्ट, पाचगणी यांच्याकडून दोन लक्ष रुपयांची देणगी प्राप्त झाल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

पाचगणी जिल्हा सातारा येथील सदरचा ट्रस्ट असून त्यांनी मंदिर समितीच्या विविध विकास कामास हातभार लागावा म्हणून



ऑनलाइन पद्धतीने देणगी दिली आहे. ऑनलाइन पद्धतीने देणगी देण्यासाठी क्यू आर कोड, आरटीजीएस, संकेतस्थळ, मोबाईल प इत्यादी माध्यमे उपलब्ध आहेत. याद्वारे देणगी देणाऱ्या भाविकांना देणगीची पावती व प्रसाद पोष्टद्वारे पाठवण्याची देखील सुविधा उपलब्ध आहे.

याशिवाय, अनिल तुकाराम खराडे राहणार कोथरूड पुणे या भाविकाने ५० हजार रुपयाची देणगी दिली असून, त्यांचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे कर्मचारी श्री रमेश गोडसे



यांनी श्री ची प्रतिमा व उपरणे देऊन यथोचित सन्मान केला.

तसेच सुनील रोहकले रा. मुंबई या भाविकांने ९२६ ग्रॅम वजनाची चांदीची समई श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या चरणी अर्पण केली असून, त्याची अंदाजे किंमत ८३ हजार इतकी होत आहे. त्याबद्दल त्यांचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे कर्मचारी पृथ्वीराज पोळ यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी मंदिर कर्मचारी सुधाकर घोडके व देणगीदार यांचे कुटुंब उपस्थित होते.

# जि.प.प्राथमिक शाळा येडोळा येथे बाल आनंद बाजार मेळावा उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के. गायकवाड) : जि.प. प्रा.शाळा येडोळा ता. तुळजापूर येथे बाल आनंद बाजार मेळावा आयोजित करण्यात आला होता.


प्रारंभी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धनराज पाटील यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून व फीत कापून या बाजार मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर बाजार मेळाव्यास सुरुवात झाली. मेळाव्यात एकूण २० स्टॉल उभारण्यात आले होते. त्यामध्ये भाजीपाला, वडापाव, भेळ, पाणीपुरी, पोहे. भजी. मोदक, पुरीभाजी, धपाटे, खारे फुटाणे,ज्यूस, जादूचे व विविध



गमती जमतीचे खेळ, मांडण्यात आले होते. हिशोब,नफा - तोटा,बाजारातील देवाणघेवाणीचे व्यवहारात ज्ञान, त्याचे प्रत्यक्ष अनुभव मुलांना यावे या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. सदर मेळाव्यास ग्रामस्थ, अंगणवाडी ताई व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सदर कार्यक्रम पार पाडण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक भरत महाबोले सर, व श्रीमती प्रतिभा स्वामी मॅडम, तसेच अंगणवाडी कार्यकर्ती श्रीमती शितल लोंढे मॅडम, श्रीमती शोभा जाधव मॅडम यांनी परिश्रम घेतले.

# पोलीस ज्योती चव्हाण यांची खोखो स्पर्धेसाठी निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : पंजाब येथे होणाऱ्या अखिल भारतीय खो-खो स्पर्धेसाठी सातनदुधनी, अक्कलकोट येथील रहिवाशी व ठाणे येथे पोलीस दलात कार्यरत असलेली ज्योती मोतीराम चव्हाण यांची निवड झाली आहे.

खो-खो राष्ट्रीय खेळाडू तथा कोच,एपीआय मुक्ता फडतरे यांच्या मार्गदर्शनाखाली पंजाब येथे होणाऱ्या अखिल भारतीय खो-खो स्पर्धेसाठी प्रथमच ठाणे पोलीस स्टेशन येथील तीन पोलिस खेळाडूंची निवड झाली आहे.महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष कमलाकर सोनकांबळे,ओबीसी विभागाचे जिल्हाध्यक्ष मोतीराम चव्हाण,माजी काँग्रेस शहर अध्यक्ष बसवराज अळ्ळोळी,समाजसेवक ज्योतिबा पारखे,सचिव विश्वनाथ चव्हाण, ओबीसी दक्षिण तालुकाध्यक्ष अशोक रजपुत,रखमाबाई काळे प्रशालाचे मुख्याध्यापक सातन दुधनी यांनी खेळाडूंचे अभिनंदन करतांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर, संगणक साक्षर व्हावेच लागेल : प्राचार्य डॉ. अशोक एक्कलदेवी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर प्रतिनिधी - पुस्तकी ज्ञानाबरोबरच संगणकीय ज्ञान असणे ही काळाची गरज झाली आहे. सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. या युगात टिकायचे असेल तर विद्यार्थ्यांनी संगणक शास्त्रातील विविध कोर्सेस करायला हवेत. ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही त्यांनी मोबाईल वरील विविध अँप वर येणारे मोफत संगणकीय कोर्स करू शकता. डव्हान्स एक्सेल, वर्ड, पॉवर पॉईंट, ग्राफिक डिझाईनिंग, सायबर सिक्युरिटी, डाटा सायन्स, डिजिटल मार्केटिंग, मोबाईल प डेव्हलपमेंट, वेब डिझायनिंग, प्रोग्रामिंग, डाटा एन्ट्री, कोरल ड्रॉ, फोटोशॉप, मिक्सिंग आदींमध्ये पारंगत व्हावे लागेल. तरच मोठ मोठ्या कंपन्यांमध्ये चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळू शकतात किंवा स्वतःचा उद्योग व्यवसाय सुरू करता येऊ शकेतो




असे प्रतिपादन ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक एक्कलदेवी यांनी केले.

ते ल. गो. काकडे एज्युकेशनल फाउंडेशन व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या मोफत बेसिक कॉम्प्युटर कोर्सच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते.

यावेळी व्यासपीठावर फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर ईलाईटचे अध्यक्ष सचिन तोष्णीवाल, सोलापूर शाखेचे सदस्य डॉ. राजीव प्रधान, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, व्यंकटेश मच्छा, अर्चना पारशेट्टी, अब्बा प्रशालेचे शिक्षक विश्वनाथ कंदी आदी उपस्थित होते.

अध्यक्षीय समारोप करताना डॉ. श्रीकांत येळेगावकर म्हणाले की, ल.गो. काकडे एज्युकेशनल फाउंडेशनने सुर केलेल्या या कोर्सला मुला, मुलींचा व महिलांचा उत्तुंग प्रतिसाद मिळत आहे. काकडे फाउंडेशनच्या डॉ. नभा काकडे, ड. अनिल काकडे, अलका काकडे हे गोरगरीब व वंचित मुले संगणक साक्षर व्हावीत यासाठी नेहमी प्रयत्नशील असतात.

यावेळी दुसऱ्या व तिसऱ्या बॅचमध्ये उत्तीर्ण झालेल्या २७ मुला मुलींना व महिलांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व बुके देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वागत प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार मनीषा चव्हाण यांनी मानले.

# जवळे (दु) ग्राम पंचायतीच्या आपले सरकार सेवा केंद्राला लागले कुलुप - वरिष्ठांचे दुर्लक्ष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव : सुधाकर रणदिवे, मौजे जवळे दुमाला (ता.धाराशिव येथील ग्रामपंचायत मधील आपले सरकार सेवा केंद्र मागील पाच-सहा वर्षांपासून बंद असल्याबाबत पंचायत समिती व जिल्हा परिषद यांचेकडे वारंवार तक्रार करूनही वरिष्ठांचे दुर्लक्ष असल्याची तक्रार श्री प्रकाश सोनार यांनी उपजिल्हाधिकारी धाराशिव यांचे कडे केली आहे.

सन २०२४ सालाच्या जुलै व डिसेंबर महिन्यात उपजिल्हाधिकारी यांनी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना दोन वेळा पत्रे देऊन आपले सरकार सेवा केंद्राची चौकशी करण्याचे आदेश दिले असतानाही अद्याप कोणतीही चौकशी वा कार्यवाही केली नाही. ही बाब प्रशासकीय दृष्टीकोनातुन अयोग्य असुन शासकीय कार्यालयीन व्यवस्थापन व कार्यपद्धतीनुसार कार्यवाही न केल्यामुळे श्री प्रकाश सोनार यांनी तीव्र नाराजी व्यक्त करुन या प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत चौकशी समिती नियुक्त करून सखोल चौकशी व उचित कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

## मैथिली शिंगाडे, ऋतुज कवडे देशमुख, पूजा गलांडे, विक्रम व्होरकाटे यांचा सत्कार

# हर्षवर्धन पाटील यांचे हस्ते महसूल सहाय्यकपदी निवड झालेल्या उमेदवारांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) वतीने सन २०२३ मध्ये झालेल्या स्पर्धा परीक्षेतून महाराष्ट्र शासनामध्ये महसूल सहाय्यकपदी निवड झालेल्या मैथिली अंबादास शिंगाडे (शेळगाव), ऋतुज राजेंद्र कवडे देशमुख (बावडा), पूजा मोहन गलांडे (गलांडवाडी नं.१),



विक्रम सोपानराव व्होरकाटे (तावशी) यांचा इंदापूर येथील भाग्यश्री बंगलो येथे शनिवारी (दि.१५) सत्कार करण्यात आला.

प्रशासनामध्ये काम करीत असताना चुकीचे असे वागू नका, त्यामुळे त्रास होतो. प्रशासनामध्ये लोकाभिमुख पद्धतीने काम करा, असे प्रतिपादन यावेळी हर्षवर्धन पाटील यांनी केले. तसेच याप्रसंगी साखर कारखान्यांच्या कार्यकारी संचालक( एम.डी.) पॅनल मध्ये निवड झालेबद्दल विजय दत्तात्रय शिर्के (वडापुरी) यांचाही हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आले.

यावेळी नीरा भीमा कारखान्याचे चेअरमन लालासाहेब पवार, इंदापूर पंचायत समितीचे माजी सभापती विलासराव वाघमोडे, उदयसिंह पाटील, दत्तात्रय शिर्के, मनोज पाटील, सुखदेव घोलप, विकास पाटील, अंबादास शिंगाडे, लालासाहेब सपकळ, राजेंद्र गायकवाड, यशवंत वाघ, बाळासाहेब गायकवाड, अरविंद जगताप, रंगनाथ देवकाते, अँड. पांडुरंग गायकवाड, महेश शिर्के, शाम परकाळे, सुरज व्होरकाटे, राहुल व्होरकाटे, नामदेव सपकळ, दत्तात्रय मळके आदी मान्यवर उपस्थित होते.



# जगद्गुरू पंचाचार्य प्रशालेत संत सेवालाल महाराज जयंती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : गौडगाव बु!! (ता. अक्कलकोट)येथील श्री गुरु सिद्धमल्लेश्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगद्गुरू पंचाचार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत थोर समाज सुधारक,बंजारा समाजाचे आराध्य दैवत, जगाला मानवतेचे शिकवण देणारे पाण्याची बचत व शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारे संत सेवालाल महाराज यांच्या जयंती साजरा करण्यात आले प्रारंभी प्रशालेचे पर्यवेक्षक लाडाप्पा शिंदे सहशिक्षक पोपट सोनकांबळे यांच्या हस्ते श्री संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी यांनी संत सेवालाल महाराज यांच्या कार्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगितले.यावेळी प्रशालेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक वर्ग विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवपुत्र चोल्ले यांनी केले तर महेश स्वामी आभार मानले.

## थोडक्यात...

### प्लॉट खरेदी केलेली रक्कम न देता केली फसवणूक

सोलापूर : अक्षय सोसायटी जुळे सोलापूर येथे दुय्यम निबंधक वर्ग दोन येथे ४३५ स्केअर फुट जागेची खरेदी करण्यात आली.यात ३ लाख ४५ हजार रुपये न देता फसवणूक करण्यात आल्याची घटना २६ मे २०२३ ते आज पर्यंत घडली. याप्रकरणी अनिल हरिश्चंद्र उपरे (रा.अक्षय सोसायटी, जुळे सोलापूर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली.त्यांच्या फिर्यादीवरून अजयराज आत्माराम सावंत (रा.अक्षय सोसायटी,जुळे सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की,यातील फिर्यादी यांच्या मालकीचे मौजे मजरेवाडी येथील गृहनिर्माण क्षेत्र विकास महामंडळ क्षेत्र सोलापूर येथील म्हाडा मंडळ भूखंड जागा जुना सर्वे नंबर ३२८/१ बी, व नवीन सर्वे नंबर ११५/१ बी, भूखंड दोन ही मिळकत आहे.यात ४३५ स्केअर फुट जागा आहे.सदरची मिळकत ही २४ लाख २० हजार रुपये खरेदी केली.हा व्यवहार तीन टप्प्यात करण्यात आला. त्याप्रमाणे पहिल्या टप्प्यात दोन लाख २५ हजार रुपये आरटीजीएसद्वारे व उर्वरित रकमेपोटी धनादेश देण्यात आला.त्यापैकी केवळ आतापर्यंत १८ लाख ८५ हजार रुपये फिर्यादीस मिळाले.परंतु उर्वरित तीन लाख ४५ हजार रुपये खरेदीस दिलेले नाही अथवा रकमेपोटी दिलेला धनादेशही वटला नाही.याबाबत फिर्यादीने संशयित आरोपीस वारंवार पाठपुरावा करून ही सदर रक्कम न देता फिर्यादीची फसवणूक केल्याची फिर्यादीत नमूद आहे.

### पाच लाखांचे दागिने पळविले

सोलापूर : रामलाल चौक येथील गौरीशंकर अपार्टमेंट येथील घरांतील लॉकरमध्ये ठेवलेले ३० ग्रॅम सोन्याचे लॉकेट, दहा ग्रॅम वजनाचे सोन्याच्या अंगठ्या असा पाच लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना १७ जानेवारी रोजी घडली.या प्रकरणी विजया राजेश बोभा (वय-३९,रा.गौरीशंकर अपार्टमेंट,रामलाल चौक) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# पंढरीत अडीच लाखांचा गांजा जप्त

## पंढरपूर शहर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेची मोठी कारवाई



**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहर पोलीस ठाणे हद्दीत १३/०२/२०२५ रोजी बडिरात बंदोबस्ताच्या अनुषंगाने पोलीस अधिकारी व अंमलदार पेट्रोलियम करीत असताना साधारण २२.१५ च्या सुमारास जुना अकलूज रोड , डी मार्ट कडे जाणारा रोड जवळ पेट्रोलिंग करीत असताना एक ईरटीका गाडी एम एच.०७ एस ३६९९ संशोध रीतीने थांबलेली दिसलीस्पद रीतीने थांबलेली दिसली गाडीमध्ये पाहिले असता संसद रित्या गाडीमध्ये पाहिले असता खाकी बॉक्समध्ये चिकटपट्टीने

**पंढरपूर शहरांमध्ये गांजा विक्री करीत असलेला आरोपी कार सह ताब्यात**

चिटकवलेली सहा बॉक्स दिसले व सदर बॉक्स जवळ जाऊन पाहिले असता त्याचा उग्र वास येऊ लागला असे समजल्यानंतर त्यात गांजा आहे असे समजले सदर गाडीमध्ये दोन इसम होते रोहन शंकर चव्हाण त्याच्यासोबत रोहित कांबळे राहणार बावडा तालुका इंदापूर जिल्हा पुणे असे असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर त्यांच्यावर कायदेशीर कारवाईची प्रक्रिया करून एन डी पी एँ ॲक्ट१९८५ कलम ८(क)२०(ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर कारवाई मध्ये एकूण १) २,४५,४४०/-रुपये किमतीचा अमली पदार्थ गांजा २) ८,००,०००/रुपये किमतीचे एर्टिगा गाडी न. एम एस ०७ एस ३७९९ गाडी असा असलेला ऐवज. असा एकूण १०,४५,४४०/रुपये किमतीचा गांजा व वाहन जप्त करण्यात आले.

सदरची कामगिरी मा. पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, व अप्पर पोलीस अधीक्षक श्री प्रीतम यावलकर, पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विश्वजीत घोडके, सहा पोलीस निरीक्षक श्री आशिष कांबळे, पोलीस उपनिरीक्षक राजेश गोसावी,सं. पो.फो. शरद कदम, पोलीस हेडकॉन्स्टेबल३९६. सुरज हेंबाडे,पो. हे.को.३९८ सीमा गोडसे,२२१ प्रसाद आवटी,१७८९, सचिन हेंबाडे,१२५५. श्री विठ्ठल विभुते,१९०४. निलेश कांबळे,१२२६ शहाजी मडले,२१९०. समाधान माने,१५१३. बजरंग बिचुकले, सायबर पोलीस ठाणे सोलापूर ग्रामीण पो. शि. रतन जाधव यांनी काम पाहिले.

# कळंब येथे व्हाइस ऑफ मिडियाच्या वतीने जेष्ठ पत्रकार आणि कर्तृत्ववान व्यक्तींचा सत्काराने सन्मानित






**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

कळंब/सुधाकर रणदिवे : आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त बुधवार दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी मुंढे कॉंपलेक्स परळी रोड येथील सभागृहात व्हाइस ऑफ मिडियाच्या वतीने दर्पनदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे दिप प्रज्वलन करून पुजन करण्यात आले पत्रकार दिनाचे औचित्य साधून कळंब तालुक्यातील जेष्ठ पत्रकार आणि कर्तृवान व्यक्तींचा प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी सत्कारमूर्ती म्हणून जेष्ठ पत्रकार म्हणून मा.गणेश आण्णा शिंदे,मा.माधव सिंग राजपूत, मा.सुभाष घोडके,दिलिप झोरी, मा.तुळशीराम चंदनशिवे तर शैक्षणिक क्षेत्रातील शरदचंद्र महाविद्यालय शिराढोण प्राचार्य मा.डॉ.साजेद चाऊस आदर्श मुख्याध्यापक म्हणून मा.राजेंद्र बिक्कड दंतरोग तज्ञ म्हणून डॉ.करिश्मा शेख यांचा शाल,पुणेरी टोपी,ट्रॉफि आणी गिफ्ट देऊन सत्कार करुन सन्मानित करण्यात आले. यावेळी व्हाइस ऑफ मिडिया धाराशिव जिल्हा संघटकपदी दै.धाराशिव नामाचे कळंब तालुका प्रतीनीधी रामराजे जगताप, धाराशिव जिल्हा उपाध्यक्षपदी दिपक बारकुल यांची निवड झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करुन सन्मानित करण्यात आले तर मराठी पत्रकार संघाचे येरमाळा अध्यक्ष मा.लहु बारकुल यांच्यासह त्यांच्या टिम सत्कार करुन सन्मानित करण्यात आले व येरमाळा येथील सेवाभावी समाजीक संस्थेने व्यायाम शाळा आणि येरमाळा येथील पत्रकार भवनासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून घेतल्याबद्दल दिपक बारकुल व त्यांच्या टिम सत्कार करुन सन्मानित करण्यात आले आहे.

तसेच हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केला त्यामुळे व्हाइस ऑफ मिडिया कळंब शाखेच्या वतीने व्हाइस ऑफ मिडिया महाराष्ट्र राज्य कार्यवाह श्री.अमर चोंदे यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करुन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कॅनव्हास इंटरनॅशनल स्मार्ट इंग्लिश स्कूलचे संचालक मा.रवि नरहिरे सर तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून पर्याय संस्थेचे सचिव मा. विश्वनाथ आण्णा तोडकर आणि उद्धघाटक म्हणून व्हाइस ऑफ मिडियाचे आहिल्या नगर जिल्हाध्यक्ष मा.गोरक्षनाथ मदने उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कळंब सहाय्यक पोलीस निरीक्षक मा.मगर साहेब,व्हाईस ऑफ मिडिया महाराष्ट्र राज्य कार्यवाह श्री.अमर चोंदे, व्हाइस ऑफ मिडिया अहिल्या नगर(द) जिल्हाध्यक्ष मा.गणेश खविटकर,जेष्ठ पत्रकार ज्ञानेश्वर पतंगे, बालाजी बप्पा आडसुळ, परमेश्वर पालकर,शितल कुमार धोंगडे, महादेव महाराज आडसुळ उपस्थित होते यावेळी प्रमुख मार्गदर्शक विश्वनाथ आण्णा तोडकर यांनी उपस्थीतांना शानदार असे मोलाचे मार्गदर्शन केले.

तसेच मा.रवि नरहिरे, गोरक्षनाथ मदने, गणेश कविटकर, महादेव महाराज आडसुळ यांनी मोलाचे मार्गदर्शन केले यावेळी व्हाईस ऑफ मिडिया धाराशिव जिल्हा संघटक रामराजे जगताप, जिल्हा उपाध्यक्ष दिपक बारकुल, तालुका उपाध्यक्ष शिवप्रसाद बियाणी, कार्याध्यक्ष रामरतन कांबळे, कोषाध्यक्ष सतीश तवले,सरचिटणीस अविनाश सावंत,तालुका डिजिटल विंगचे तालुका अध्यक्ष अमोल रणदिवे, कार्याध्यक्ष सलमान मुल्ला, साप्ताहिक विंगचे तालुकाध्यक्ष राजाभाऊ बारगुले,अतुल मडके,दादा खतीब,हाणूमंत पाटुळे, राहुल गाडे, अनिल गाडे,व तालुक्यातील पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व व्हाईस ऑफ मिडिया तालुका शाखेच्या सर्व पदाधिकारी आणि सदस्य यांनी परिश्रम घेतले प्रस्तावित रामरतन कांबळे यांनी केले तर सुत्रसंचलन ह भ प जोशी सर तर आभार दादा खतीब यांनी मानले.

# सम्यक विद्यार्थी आंदोलन अक्कलकोटच्या वतीने रमाई आंबेडकर यांची जयंती साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी

सी,बी खेडगी महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहात आणि आनंदात त्यामूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांची जयंती सम्यक विद्यार्थी आंदोलन अक्कलकोटच्या वतीने साजरी करण्यात आली. यावेळी रमाईच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. शिवराज आडवीतोटे सर यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी डॉ. किशोर थोरे सर, प्राध्यापक वाघमारे सर, डॉ.कांबळे सर, प्राध्यापक सुरवसे सर यांनी मनोगत व्यक्त केले.

सम्यक विद्यार्थी आंदोलन महाराष्ट्र राज्य प्रवक्ता इंजिनीयर रविराज पोटे यांनी चांगला उपक्रम राबवला आहे व नेहमी ते चांगले कार्यक्रम आणि उपक्रम राबवत असतात असं प्रतिपादन प्रमुख पाहुण्यांनी केले अखंड १८ तास अभ्यास अभिवादनाच्या उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. यावेळी मुंबई पोलीस बाबा बनसोडे, रोहित उघडे, गंगाराम वाघमारे, श्रीधर दसाडे, सम्राट सोनकांबळे, महेश बनसोडे, सागर मस्के, समर्थ बनसोडे, सुषमा किरगल, सृष्टी गायकवाड, आदीसह विद्यार्थी मुलं मुली मोठ्या संख्येने उपस्थित होते

# मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांना बहुजन हक्क परिषदेच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन सादर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी : पुरंदर तालुक्यातील पंचायत समिती मधील ग्रामसेवक जाणीवपूर्वक दलित वस्तीतील विकास कामांचे प्रस्ताव जाणीवपूर्वक करत नाहीत. जिल्हा परिषदेमधील समाज कल्याण निधी व २० टक्के निधी यांचा प्रस्ताव ग्रामसेवक पंचायत समितीमध्ये देण्यास टाळाटाळ करतात. ग्रामीण भागातील लोकांना कोणत्याही योजना समजून सांगत नाहीत. अथवा ग्राम सूचना फलकावर लावत नाहीत. बहुतेक ग्रामसेवक पुरंदर पंचायत समितीमध्ये काम आहे असे सांगून शेतातील कामे करत असतात. त्यांचे वैयक्तिक कामे ते करत असतात. हालचाल रजिस्टर हे ग्रामपंचायत मध्ये ठेवायचं असतं ते हालचाल रजिस्टर ग्रामसेवक त्यांच्या बॅगमध्ये घेऊन फिरत असतात. ग्रामसेवक कोठे जातात कोठे जातात याचा तपास बी.डी. ओ.लाही नसतो. आणि गावातील लोकांना ग्रामसेवक आलेले माहीतच नसतात. तरी आपण सर्व ग्रामपंचायत ग्रामसेवकांना लेखी सूचना देऊन दलित वस्तीतले विकासात्मक प्रस्ताव करून पंचायत समितीमध्ये संबंधित विभागाकडे देण्यास सांगावे.

बहुतेक ग्रामसेवक कर्मचारी हे ग्रामपंचायत मध्ये वेळेत हजर नसतात. आम्ही संघटनेच्या माध्यमातून ग्रामसेवकांची बायोमेट्रिक हजेरी सुरू करावी अशी मागणी पंचायत समितीकडे संघटनेच्या पत्राद्वारे केलेली होती. पत्राला देखील केराची टोपली दाखवलेली आहे.

तरी आपण या सर्व गोष्टींचा गांभीर्याने विचार करून संबंधित ग्रामसेवकांवर योग्य ती कारवाई करून त्यांना लेखी सूचना द्याव्यात . त्यांच्यावर काय कारवाई केली याची माहितीसाठी प्रत संघटनेला द्यावी. अन्यथा जिल्हा परिषद कार्यालयासमोर संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन केले जाईल. असे निवेदन बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनील तात्या धिवार व सचिव कैलास धिवार यांनी दिले.


**निवडणूक घेऊन करण्यात आली निवड**

**तालुकाध्यक्षपदी वैष्णव, शहराध्यक्षपदी सुरवाडे तर कार्याध्यक्षपदी खर्चे यांची निवड**

# व्हॉईस ऑफ मीडियाची मलकापूर कार्यकारणी जाहीर











**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मलकापूर/केतन भोज : पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी लढणारी देशव्यापी संघटना व्हॉईस ऑफ मिडियाच्या मलकापूर तालुका व शहर कार्यकारणी निवड प्रक्रिया दि. १३ फेब्रुवारी रोजी संघटनेचे राज्य कार्यवाह लक्ष्मीकांत बगाडे व जिल्हा अध्यक्ष कृष्णा सपकाळ यांच्या उपस्थितीत पार पडली. यामध्ये निवडणूक प्रक्रियेद्वारे बहुमताने तालुकाध्यक्षपदी धीरज वैष्णव तर शहर अध्यक्षपदी समाधान सुरवाडे, कार्याध्यक्षपदी विलास खर्चे यांच्यासह आदी पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

आंतरराष्ट्रीय स्तरावर पत्रकारांचे नेटवर्क पसरविने, पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी लढणारी व्हाईस ऑफ मीडिया ही पत्रकार संघटना देशभरात क्रमांक एकची संघटना म्हणून ओळखली जाते. पत्रकार विकास मंडळ असो व पत्रकारांच्या विविध मागण्या, न्याय व हक्कासाठी सरकारशी एक प्रकारे भांडून पत्रकार आर्थिक विकास मंडळ स्थापन करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका व्हाईस ऑफ मीडिया या संघटनेची आहे. तसेच शहरात सुद्धा व्हाईस ऑफ मीडिया या संघटनेच्या माध्यमातून गतकाळात अनेक समाज उपयोगी तथा पत्रकार हिताचे उपक्रम सुद्धा राबविण्यात आले आहेत. अशा या संघटनेचे मलकापूर तालुका व शहर कार्यकारिणीचा कार्यकाळ संपल्याने पुन्हा कार्यकारणी गठित करण्यासाठी आज सामाजिक कार्यकर्ते विजय डागा यांच्या फार्म हाऊस वर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी व्हॉईस ऑफ मीडियाचे राज्य कार्यवाह लक्ष्मीकांत बगाडे, जिल्हाध्यक्ष कृष्णा सपकाळ, विदर्भ उपाध्यक्ष वीरसिंह दादा राजपूत यांच्या उपस्थितीत लोकशाही पद्धतीने निवडणूक घेऊन, निवडणूक प्रक्रियेद्वारे कार्यकरणी घोषित करण्यात आली.निवडणूक प्रक्रियेद्वारे बहुमताने तालुका अध्यक्षपदी धीरज वैष्णव शहराध्यक्षपदी समाधान सुरवाडे व कार्याध्यक्षपदी विलास खर्चे यांची निवड झाली. तसेच राजेश इंगळे तालुका उपाध्यक्ष, श्रीकृष्ण भगत तालुका सचिव, अशोक रावणकार शहर उपाध्यक्ष, गौरव खरे सचिव, स्वप्निल आकोटकर सहसचिव, प्रवीण राजपूत कोषाध्यक्ष, शेख जमीन संघटक, भिवा चोपडे कार्यवाह, कैलास काळे प्रसिद्धीप्रमुख पदी निवड करण्यात आली. याप्रसंगी नव्याने सदस्य झालेले पत्रकार विनायक तळेकर, अनिल उदगे, रामेश्वर गोरले, निखिल चीम यांच्यासह आदींचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी शेतकरी नेते दामोदर शर्मा, सामाजिक कार्यकर्ते विजय डागा, वरिष्ठ पत्रकार हनुमान जगताप, नितीन पवार, मनोज पाटील, विजय वर्मा, अक्षय थीगळे, डॉ. सुभाष तलरेजा यांच्यासह आदी पत्रकार उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन प्रा.डॉ.नितीन भुजबळ यांनी केले तर आभार राजेश इंगळे यांनी केले.

**लोकशाही पद्धतीने निवडले नविन पदाधिकारी**

**व्हॉईस ऑफ मिडिया संघटन रचनेनुसार तालुका अध्यक्ष धिरज वैष्णव यांचा ३ वर्षांचा कार्यकाळ पुर्ण झाल्लाने नविन अध्यक्ष निवडण्यासाठी राज्य कार्यवाह लक्ष्मिकांत बगाडे व जिल्हाध्यक्ष कृष्णा सपकाळ यांनी लोकशाही पद्धतीने निवडणूक प्रक्रिया पुर्ण करून नवीन कार्यकारिणी निश्चितीवर शिक्का मोर्तब केला.**

**अध्यक्ष पदासाठी धिरज वैष्णव यांच्या नावाला बहुमताने पाठिंबा**

**निवड प्रक्रियेदरम्यान निवडणूक निर्णय अधिकारी लक्ष्मीकांत बगाडे यांनी केलेल्या सुचनेनुसार अध्यक्ष पदासाठी इच्छुक उमेदवारांनी एक सुचक आणि दोन अनुमोदक उपस्थित करून निवडणूक प्रक्रिया पुर्ण करावी. यावेळी झालेल्या निवडणूक प्रक्रिये दरम्यान धिरज वैष्णव यांच्या तर्फे समाधान सुरवाडे सुचक तर गौरव खरे व कैलास काळे हे अनुमोदक राहिले. तसेच नागेश सुरंगे यांनी अध्यक्ष पदासाठी सुचवलेल्या विजय वर्मा यांच्या नावासाठी अनुमोदक नसल्याने ही निवडणूक एकतर्फी होऊन धिरज वैष्णव यांची उर्वरित सदस्यांनी एकमताने व्हॉईस ऑफ मिडियाचे मलकापूर तालुका अध्यक्ष म्हणून निवड केली.**